**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**
**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक — ५९५/२०२२/नंदुरबार**

१ श्री. अशोक मदन प्रकाशकर : अपिलार्थी
रा. १८, पटेलवाडी, कोरीटरोड,
नंदुरबार, ता.जि. नंदुरबार.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
वनक्षेत्रपाल,
वनपरिक्षेत्र अधिकारी चिंचपाडा (प्रा.) यांचे कार्यालय
चिंचपाडा, रेल्वे स्टेशन समोर,
ता. नवापुर, जि. नंदुरबार.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, : प्रतिवादी
सहाय्यक वनसंरक्षक,
सहायक वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव),
नंदुरबार यांचे कार्यालय, पंचायत समिती समोर,
नंदुरबार, ता.जि. नंदुरबार.

**सुनावणी दिनांक — ०८/१२/२०२२**

अपिलार्थी यांनी दि. १६/१२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.०८/१२/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी, तत्कालीन/विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी
**सुनावणीसाठी अनुपस्थित-** तत्कालीन जन माहिती अधिकारी

अपिलार्थी यांनी दि. १६/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन १९९७ ते सन २०२१ या कालावधीतील सर्व योजना अंतर्गत वृक्ष लागवड, जलसंधारण, मृदसंधारणाची झालेल्या कामांच्या क्षेत्राची माहिती-कंपार्टमेंट नंबर/गट क्र., प्रस्तावित क्षेत्र, सदर क्षेत्राची अक्षांश/रेखांश व सदर क्षेत्र निवडीबाबत प्रपत्र पी-१ रोपवनांबाबत अंदाजपत्रकासोबत जोडावे लागणारे प्रमाणपत्र संबंधित सहाय्यक वनसंरक्षक यांनी दिलेले व सदर क्षेत्रावर दुबार योजना राबविली असल्यास त्याबाबतची संपूर्ण कागदपत्रे मे. औरंगाबाद उच्च न्यायालयात दाखल न्यायालयीन प्रकरणांसाठी माहितीचे पेजेस मोजुन शुल्काची आकारणी करुन माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना विहीत मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसुन येत नाही.

तद्नंतर कोणतेही उत्तर न मिळाल्याने अपिलार्थी यांनी दि. १८/१०/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि. ०९/११/२०२१ रोजी, निर्णय

पारित करुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती १४ दिवसात विनामुल्य पुरविण्याचे निर्देश जन माहिती अधिकारी यांना देवून प्रथम अपिल निकाली काढले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत व प्रथम अपिल आदेशानंतर माहिती पुरविल्याबाबत कोणतेही अभिलेख उपलब्ध नाही. तसेच अपिलार्थी यांनी सांगितले की, जन माहिती अधिकारी यांच्या कडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १६/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल वनपरिक्षे अधिकारी, चिंचपाडा (प्रा.) श्री. मंगेश रामदास चौधरी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध मुद्येनिहाय माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती पुरविता येत नाही त्याबाबत स्पष्ट कारणे देखील कळविण्यात यावीत.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल वनपरिक्षे अधिकारी, चिंचपाडा (प्रा.) श्री. एस.आर. रत्नपारखे यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ५९५/२०२२/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) उप वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव), नंदुरबार यांचे कार्यालय, पंचायत समिती समोर, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री. एस.बी. रत्नपारखे (तत्कालीन जन माहिती अधिकारी) वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी चिंचपाडा (प्रा.) यांचे कार्यालय चिंचपाडज्ञ, रेल्वे स्टेशन समोर, ता. नवापुर, जि. नंदुरबार.

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./५९५/२०२२/नंदुरबार ओ-** 238 **दिनांक-** 22/02/2023

राज्य माहिती आयोग
खंडपीठ नाशिक